



■ २२ कॅरेट सोने दर : १,३८,०००/- ■ चांदी दर : २,४०,०००/-


शब्दांना सत्याची धार

# प्रहार

सिंधुदुर्ग • सोमवार २२ जून, २०२६

RNI Reg.No.: एमएचएमएआर/२००८/३३७८७ • वर्ष २२ • अंक २२३ • पाने ८ • ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in




जपान बाद फेरीच्या दिशेने

पान ८

# ऑपरेशन यशस्वी बॉडी सुदृढ

- 'ऑपरेशन टायगर'वर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सूचक विधान
- विरोधकांचे ६ पानी पत्र 'एआय' निर्मित!: चहापानावरील बहिष्कारावरून महाविकास आघाडीला टोला



**मुंबई (प्रतिनिधी)**

राज्य विधिमंडळाचे सोमवारपासून सुरू होणारे पावसाळी अधिवेशन पूर्ण वेळ म्हणजे तीन आठवडे चालणार असून, यामध्ये सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे अनेक मोठे निर्णय घेतले जातील. या अधिवेशनात सरकार एकूण १० महत्त्वाची विधेयके मांडणार आहे. यामध्ये शेतात राबणाऱ्या पण उपेक्षित राहिलेल्या (पान २ वर)

### अमेरिका-इराणचे युद्ध संपले, पण विरोधकांचा चहापानावरचा बहिष्कार संपत नाही - एकनाथ शिंदे

पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधकांनी चहापानावर टाकलेल्या बहिष्कारावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या खास शैलीत जोरदार टोलेबाजी केली. ते म्हणाले, "विरोधकांना आमचा दिवसाचा चहा आवडत नाही. पण, ते लपूनछपून आम्हाला भेटत राहतात. त्यामुळे त्यांनी आता चहाऐवजी दुसरे पेय (पान २ वर)

## आजपासून पावसाळी अधिवेशनाला सुरुवात

### विधिमंडळाची दोन्ही सभागृहे विरोधीपक्ष नेत्याविनाच!

### इंधन-पाणी टंचाई, कर्जमाफी, उपवर्गीकरणावर वादळी चर्चेची शक्यता

**मुंबई**



महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आज, सोमवारपासून सुरू होत असून, या अधिवेशनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत 'विरोधी पक्षनेता' नसेल. विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद हे विद्यमान सरकार अस्तित्वात आल्यापासून रिक्त आहे; तर विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेतेपद अंबादास दानवे यांचा कार्यकाळ संपल्यापासून रिक्त राहिले आहे. दोन्ही सभागृहातील विरोधकांचे संख्याबळ पाहता २२ जून ते १० जुलै या कालावधीत चालणारे हे अधिवेशन देखील विरोधी पक्षनेत्याविनाच चालणार असून, जनतेचे ज्वलंत प्रश्न सभागृहात ताकदीने मांडण्याऐवजी विरोधक सध्या स्वतःचे अस्तित्व आणि आमदार टिकवण्यासाठी चाचपडत असल्याचे सध्याचे चित्र आहे.

विधानसभेत सध्या २० आमदारांसह ठाकरे गट हा तांत्रिकदृष्ट्या सर्वात मोठा विरोधी पक्ष असला, तरी त्यांच्यावर सातत्याने फुटीची टांगती तलवार आहे. दुसरीकडे, शरद पवार गटातूनही (पान २ वर)

# योग केवळ व्यायाम नाही; तो जगण्याचा मार्ग – पंतप्रधान मोदी

- पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत कोलकात्यात मुख्य सोहळा
- देशभरात केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्र्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**कोलकाता/मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आज १२ वा 'आंतरराष्ट्रीय योग दिन' पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथील ऐतिहासिक रेड रोडवर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी हजारो लोकांसोबत योगसाधना करत पंतप्रधानांनी २१ जून हा 'जगातील सर्वात मोठा सामूहिक उत्सवाचा दिवस' असल्याचे म्हटले. या सोहळ्याचे औचित्य साधून देशभरात सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री आणि वरिष्ठ नेत्यांनी विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होत योगसाधना केली.

यावर्षीच्या योग दिनाची संकल्पना (थीम) "निरोगी वृद्धत्वासाठी योग" अशी ठेवण्यात आली असून, वाढत्या वयातही शारीरिक आरोग्य, मानसिक शांतता आणि उत्तम जीवनशैली राखण्यावर याद्वारे भर देण्यात आला आहे. कोलकाता येथील जनसमुदायाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "योग हा केवळ शारीरिक व्यायाम नाही आणि तो कोणत्याही एका वयोगटापुरता मर्यादित नाही; (पान २ वर)

## खा. नारायण राणे उद्या सिंधुदुर्ग दौऱ्यावर

**कणकवली**



रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघाचे खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे हे मंगळवारी (२३ जून) सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या नियोजित दौऱ्याप्रमाणे ते मंगळवारी दुपारी कणकवली येथे पोहोचणार आहेत.

खासदार नारायण राणे हे मंगळवारी सकाळी ७:४५ वाजता मुंबईतील त्यांच्या जुहू येथील 'अधीश' निवासस्थानावरून मुंबई विमानतळाकडे रवाना,सकाळी ९:१५ वाजता मुंबई विमानतळावरून गोव्याकडे प्रयाण, सकाळी १०:३० वाजता मोपा विमानतळावर आगमन झाल्यानंतर तेथून सावंतवाडी मार्गे प्रवास करत दुपारी १२ वाजता कणकवली येथील 'ओम गणेश' या आपल्या निवासस्थानी आगमन. व स्थानिक कार्यक्रमांना उपस्थिती राहणार असल्याचे खा. नारायण राणे संपर्क कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

# शेतकरी–मच्छीमारांच्या वेदनांची मंत्री नितेश राणे यांना जाणीव

### यंदा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय; दुष्काळाच्या सावटामुळे संवेदनशील पाऊल

**मुंबई**



कोकणातील आंबा आणि काजू पिकांचे झालेले नुकसान, लांबलेल्या पावसाळ्यामुळे मच्छीमार बांधवांची झालेली परवड, तसेच राज्यभरात 'एल-निनो'च्या सावटामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई व दुष्काळाची कठीण परिस्थिती लक्षात घेऊन राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी यंदा २३ जून रोजी आपला वाढदिवस साजरा न करण्याचा संवेदनशील निर्णय घेतला आहे. आपल्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून त्यांनी या निर्णयाची घोषणा केली असून, सध्याच्या कठीण काळात कोणत्याही प्रकारच्या आनंदोत्सवापेक्षा परिस्थितीचे भान राखणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतानाच मंत्री नितेश राणे यांनी आपले हितचिंतक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष भेटायला न येण्याचे आवाहन केले आहे. या कठीण काळात कार्यकर्त्यांनी आपापल्या भागात विधायक काम करावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे. "माझ्या सर्व कार्यकर्त्यांना विनंती आहे की, त्यांनी मला प्रत्यक्ष भेटायला न येता आपापल्या जिल्ह्यात 'गो-सेवा' करावी व विविध समाजोपयोगी उपक्रम राबवावेत. हिंदुत्वाच्या संस्कारातून गोमातेची सेवा, गोसंवर्धनाच्या कार्यात सहभाग (पान २ वर)

## 'एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात काम करणार'

- खासदार ओमराजे निंबाळकरांचं ठरलं
- पत्रकार परिषद घेत भूमिका जाहीर केली

**धाराशिव**



खासदार ओमराजे निंबाळकर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. आज ओमराजे निंबाळकर यांनी आपल्या मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची बैठक घेतली. यात ओमराजेंनी एकनाथ शिंदे यांचे कौतुक केले. तसेच मी जो निर्णय घेत आहे तो सर्वांना मान्य असावा, असेही त्यांनी कार्यकर्त्यांच्या सोबत झालेल्या बैठकीत म्हटले होते. त्यानंतर पत्रकार परिषद घेत त्यांनी आपली भूमिका जाहीर केली आहे. (पान २ वर)

## विधानपरिषदेच्या ११ जागांचा आज निकाल

### महायुतीचे पारडे जड; सांगली-सातारा आणि सोलापूरकडे लक्ष

**मुंबई (प्रतिनिधी)**

एकीकडे 'ऑपरेशन टायगर'मुळे वातावरण तापलेले असतानाच, दुसरीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या विधानपरिषदेच्या ११ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकीचा निकाल आज, सोमवार २२ जून रोजी जाहीर होणार आहे. या निवडणुकीसाठी सरासरी ९९.०२ टक्के मतदान झाले होते. राज्यातील एकूण १७ जागांपैकी ६ जागांवर महायुतीचे उमेदवार आधीच बिनविरोध निवडून आले असल्याने उर्वरित ११ जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली.

गुरुवारी (१८ जून) दुपारी ४ वाजता मतदान संपल्यानंतर सर्व मतपेट्या कडेकोट बंदोबस्तात स्ट्राँग रूमकडे रवाना करण्यात आल्या होत्या. सोमवारी दुपारपर्यंत सर्व ११ जागांचे चित्र पूर्णपणे स्पष्ट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, नाशिक मतदारसंघात मतदान सुरू असताना, समाजमाध्यमांवर 'पसंती क्रमांक एक-गोकुळ गिते' अशी एक बनावट मतपत्रिका प्रसारित झाली. यामुळे महायुतीच्या गोटात काही काळ संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, भाजपचे संकटमोचक गिरीश महाजन यांनी तातडीने सूत्रे हाती घेत यावर स्पष्टीकरण देण्याचे निर्देश दिले. यानंतर गणेश गिते आणि गोकुळ गिते यांनी तात्काळ माध्यमांसमोर येत, "आम्ही महायुतीचा धर्म पाळत निवडणूक आधीच सोडली असून हा निव्वळ खोडसाळपणा आहे," असे जाहीर केले आणि मतदारांना कोणत्याही गैरसमजात न पडण्याचे आवाहन केले. नाशिकमध्ये ६१९ पैकी ६१८ मतदारांनी मतदान केले असून, सर्व मते वैध ठरल्यास विजयासाठी ३१० मतांचा कोटा आवश्यक ठरेल.

अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात काँग्रेसमधील अंतर्गत यादवी आणि गटबाजी मतदानाच्या दिवशी उघड चव्हाट्यावर आली. काँग्रेस पक्षाने आपल्या सर्व सदस्यांना या मतदानात तटस्थ राहण्याचा 'व्हीप' (पक्षादेश) बजावला होता. मात्र, काँग्रेसच्या तब्बल ९५ नगरसेवकांनी हा पक्षादेश धुडकावून लावत मतदानात उघडपणे (पान २ वर)

# सीफूड कारखान्यात अमोनिया गॅस गळती

## तामिळनाडूतील ७ महिला कामगारांचा मृत्यू; ६७ जण रुग्णालयात

**तिरुवल्लूर**



तामिळनाडूतील तिरुवल्लूर जिल्ह्यातील पेरियापालयमजवळील कन्निगाईपेअर गावात एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. येथील 'सेंट पीटर्स पॉल सीफूड्स एक्स्पोर्ट्स' या मत्स्य प्रक्रिया केंद्रात अमोनिया वायूची मोठी गळती झाली. या वेदनादायक घटनेत ७ महिला कामगारांचा मृत्यू झाला असून, किमान ६७ कामगारांवर सध्या वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, रुग्णालयात दाखल असलेल्या कामगारांपैकी ७ जणांची प्रकृती अत्यंत गंभीर असून त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले आहे. या अपघाताचा बळी ठरलेले बहुतांश कामगार हे उत्तर भारतातील विविध राज्यांमधून आलेले स्थलांतरित मजूर आहेत.

रविवारी कारखान्यात काम सुरू असताना अचानक अमोनिया वायूची गळती सुरू झाली, ज्यामुळे कारखाना परिसरात एकच खळबळ उडाली. वायूच्या संपर्कात आल्यामुळे कामगारांना श्वास घेण्यास त्रास होणे, चक्कर येणे आणि उलट्या होण्याचा त्रास सुरू झाला. प्राथमिक तपासानुसार, कारखान्यात बसवलेल्या एका मुख्य व्हॉल्व्हमधून हा अमोनिया गॅस लीक झाला. घटनेची माहिती मिळताच बाधित कर्मचाऱ्यांना तातडीने रुग्णवाहिकेच्या सहाय्याने जवळच्या रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले.

**कंपनीवर गुन्हा दाखल, मालकाला अटक**

घटनेची गंभीर दखल घेत तामिळनाडू सरकारने गॅस गळतीची चौकशी करण्यासाठी डीन डॉ. शांताराम यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. या समितीला घटनेची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे (पान २ वर)

## आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा सातवा दिवस

### आजपासून राज्यभरातील कार्यालयांमध्ये दोन तास ठिय्या आंदोलन

**मुंबई**

आरटीओ कर्मचारी संघटनेने आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी १६ जूनपासून सुरू केलेले बेमुदत संप आंदोलन आता अधिक तीव्र झाले आहे. संपाच्या सातव्या दिवशीही प्रशासनाकडून सकारात्मक पावले न उचलली गेल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, सोमवारपासून आंदोलनाची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. (पान २ वर)

# ब्रह्मोसने सुसज्ज आयएनएस दूनागिरी नौदलात समाविष्ट

- अँटी सबमरीन आयएनएस अग्रय, आयएनएस संशोधक यांचाही समावेश
- ही नव्या भारताची सर्वात मोठी ताकद - मोदी

**कोलकाता (वृत्तसंस्था)**




कोलकाता येथील श्यामा प्रसाद मुखर्जी पोर्टवर तीन स्वदेशी युद्धनौका भारतीय नौदलात सामील झाल्या. देशातच डिझाइन केलेल्या आणि बनवलेल्या जहाजांच्या समावेशामुळे देशाची ऑपरेशनल क्षमता वाढेल. यावेळी कार्यक्रमात पंतप्रधान मोदीही उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, यांची निर्मिती भारतात झाली आहे. डिझाइन भारतात झाले आहे. भारतीय अभियंत्यांचे कौशल्य आणि परिश्रम लागले आहे. ही नव्या भारताची सर्वात मोठी ताकद आहे. आज भारत संरक्षण क्षेत्रात केवळ खरेदीदार म्हणून राहू इच्छित नाही.

त्यांनी पुढे सांगितले की, आपली लष्करी शक्ती जगासाठी बाजारपेठ बनू शकत नाही. माझ्या शक्तीची ओळख जगाची बाजारपेठ बनण्यात नाही, तर माझ्या आत्मनिर्भरतेत आहे. भारताला निर्माता बनायचे आहे. ज्या दिवशी आपण निर्माता होऊ, त्या दिवशी आपण निर्णायकही होऊ.

या जहाजांची नावे एडवांस्ड स्टील्थ फ्रिगेट आयएनएस दूनागिरी, सर्वे वेसल आयएनएस संशोधक आणि अँटी-सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट आयएनएस अग्रय अशी आहेत. या जहाजांना भारतीय नौदलाच्या वॉरशिप डिझाइन ब्युरोने डिझाइन केले होते आणि कोलकाता येथील गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनियर्स (जीआरएसई) ने बनवले होते.

**आयएनएस दूनागिरी-ब्रह्मोससारख्या क्षेपणास्त्रांनी सुसज्ज**

आयएनएस दूनागिरी ही प्रोजेक्ट-१७ए'ची (पान २ वर)



# आला रे आला!

### सिंधुदुर्गासह पुणे, साताऱ्यात पावसाची दमदार हजेरी; बळीराजाला मोठा दिलासा

**सिंधुदुर्ग**

गेले १५ दिवस दडी मारलेल्या मान्सूनच्या आगमनाने रविवारी बळीराजा सुखावला.दुपारी ढगांच्या गडगडाटासह त्याने सलामी दिली अन सायंकाळी दमदार हजेरी लावली. दरम्यान राज्यातील अनेक भागांत पावसाने दमदार हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना आणि पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पुणे, सातारा, भिवंडी, रत्नागिरी, महाड आणि (पान २ वर)